DR. G. D. POL FOUNDATION
Y.M.T. HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE - HOSPITAL
(POST-GRADUATE INSTITUTE)
Institutional Area, Sector-4, Kharghar, Navi Mumbai - 410 210.
Off Tel. NO. 022-27745439
Principal Tel No. : 022-27744407
E-mail: ymthmc@gmail.com
Website: www.gdpfymthmc.org

Ref. No. YHMC/UG / /

Date: 30 / 01 /2025

| College Type | College Location | Year of Establishment | | |
|---|---|---|---|---|
| (Government/ Private / Minority) | Urban / Rural / Tribal | UG | PG | Ph.D |
| Private | Rural | 1989 | 2002 | 2019 |

Y.M.T. HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE KHARGHAR ★

Dr. (Mrs.) S. P. Dandge
Principal
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210.

पदविका (बी.एच.एम.एस.) होमिओपॅथीक महाविद्यालय पदवी (बी.एच.एम.एस.) होमिओपॅथी महाविद्यालयात रुपांतरीत करण्यास परवानगी देण्याबाबत.

येरळा मेडिकल ट्रस्ट अँण्ड रिसर्च सेंटर, करी रोड, मुंबई.

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्र. एमईडी-१०९५/सीआर-२९२/९५/शिक्षण-२

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक:२२ ऑक्टोबर, १९९६

## शासन निर्णय :

केंद्रिय होमिओपॅथी परिषदेने निर्देश दिल्याप्रमाणे राज्यातील सर्व पदविका होमिओपॅथीक महाविद्यालयांना शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. एमईडी-१०९३/सीआर ३८७/शिक्षण-१, दि.२२.६.९३ अन्वये अशा सुचना देण्यात आल्या होत्या की, सदर संस्थांमार्फत चालविण्यात येणारी पदविका महाविद्यालये उत्क्रांत करुन त्यांचे पदवी महाविद्यालयामध्ये रुपांतरीत करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. तदनुषंगाने येरळा मेडिकल ट्रस्ट अँण्ड रिसर्च सेंटर, करी रोड, मुंबई या संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या पदविका होमिओपॅथीक महाविद्यालयाचे पदवी होमिओपॅथीक महाविद्यालयामध्ये रुपांतरीत करण्यास केंद्रिय होमिओपॅथी परिषदेने त्यांचे पत्र क्र. १६-६/९६/सीसीएच-३९३६, दि.८.८.९६ अन्वये तसेच मुंबई विद्यापीठाने त्यांचे पत्र क्र. एएफएफ/आरइसीओजी/६७७०-७३/९५, दि.२९ डिसेंबर १९९५ अन्वये काही अटींच्या अधीन राहून मान्यता दिली आहे.

येरळा मेडिकल ट्रस्ट अँण्ड रिसर्च सेंटर, करी रोड, मुंबई या संस्थेने मुंबई उच्च न्यायालय येथे याचिका क्र. ५१५२/९६ दाखल केली होती. या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाने दि. १५.१०.१९९६ रोजी असे आदेश दिले आहेत की, येरळा मेडिकल ट्रस्ट अँण्ड रिसर्च सेंटर, करी रोड, मुंबई या संस्थेच्या पदवी महाविद्यालय सुरु करण्याच्या अर्जावर दि. २२ ऑक्टोबर १९९६ पर्यन्त शासनाने निर्णय घ्यावा.

या अनुषंगाने येरळा मेडिकल ट्रस्ट अँण्ड रिसर्च सेंटर, करी रोड, मुंबई या संस्थेला पदवी होमिओपॅथी (बी.एच.एम.एस.) अभ्यासक्रम सुरु करण्यास मुंबई विद्यापीठाने संलग्नीकरण दिलेल्या दिनांकापासून परवानगी देण्यात येत आहे. सदर परवानगी खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

१) प्रस्तुत पदवी होमिओपॅथी (बी.एच.एम.एस.) महाविद्यालयाची प्रवेश क्षमता १०० इतकी मर्यादित राहील.

२) सदर महाविद्यालयातील प्रवेश मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्र. ६०७/९२ उन्नीकृष्णन विरुध्द आंध्रप्रदेश या प्रकरणात दिलेल्या आदेशानुसार वैद्यकीय व तत्सम अभ्यासक्रमासाठी विहीत केलेल्या प्रवेश पध्दतीनुसार ५० टक्के जागा मुक्त जागा व ५० टक्के जागा मूल्याधारीत जागा असे असेल. हे प्रवेश शासनाने नियुक्त केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून करण्यात येतील.

३) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८१ व ८२ नुसार या महाविद्यालयास संलग्निकरण करण्याची योग्य ती कार्यवाही संस्था व विद्यापीठ स्तरावर करण्यात येईल. तसेच मुंबई विद्यापीठाने त्यांचे पत्र क्र. एएफएफ/आरइसीओजी/६७७०-७३/९५, दि.२९ डिसेंबर १९९५ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता संस्थेने करावी व त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

Dr. (Mrs.) S. P. Dandge
Principal
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210.

Y.M.T. KHARGHAR COLLEGE

४) सदर संस्थेस आवर्ती किंवा अनावर्ती स्वरुपाच्या खर्चाकरिता शासनाकडे अनुदानाची मागणी करता येणार नाही.

५) केंद्रिय होमिओपॅथी परिषदेने त्यांच्या पत्र क्र. १६-१/९६-सीसीएच/३९३६, दि. ८.८.९६ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता संस्थेने ९० दिवसाच्या आंत करणे बंधनकारक राहील, तसेच या अटींची पूर्तता केल्याबाबतचा अहवाल संस्थेने ३० नोव्हेंबर १९९६ पर्यन्त शासनास व विद्यापीठास सादर करावा.

६) केंद्रिय होमिओपॅथी परिषदेने त्यांच्या पत्र क्र. १६-१/९६-सीसीएच/३०३६, दि. ८.८.९६ मध्ये नमूद केल्या प्रमाणे सदर संस्थेस फक्त १९९६-९७ या शैक्षणिक वर्षाकरिताच परवानगी देण्यात येत आहे. केंद्रिय होमिओपॅथी परिषदेने नमूद केलेल्या अटींची पूर्तता संस्थेने केल्यानंतरच १९९७-९८ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

७) शासनाने वेळोवेळी घेतलेले निर्णय संस्थेवर बंधनकारक राहतील.

८) उपरोक्त सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे लेखी अभिवचन संस्थेने संचालक, आयुर्वेद मुंबई यांच्याकडे ७ दिवसांच्या आत सादर करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(श्री.भि.मंचाली)
कार्यासन अधिकारी

प्रत,
संचालक, आयुर्वेद मुंबई
उपसंचालक (होमिओपॅथी) आयुर्वेद संचालनालय म.रा.मुंबई
सहायक संचालक आयुर्वेद नागपूर/पुणे/मुंबई
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ मुंबई
प्रशासक, महाराष्ट्र होमिओपॅथीक कौन्सिल मुंबई
प्राचार्य, वेण्णा मेडिकल ट्रस्ट अँण्ड रिसर्च सेंटर, करी रोड, मुंबई चे होमिओपॅथीक महाविद्यालय,
त्रिवेणी संगम बिल्डींग, करी रोड, मुंबई ४०० ०१२
नियतनस्ती (शिक्षण-२)

Dr. (Mrs.) S. P. Dandge
Principal
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210.

Y.M.T. HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE
KHARGHAR

dic-man(2-31.doc
लाजेवार/-

"विना अनुदान तत्वावर" खाजगी होमिओपॅथी [पदविका] महाविद्यालये सन १९८९-९० च्या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात परवानगी व त्याबाबतच्या अटी व शर्ती.

महाराष्ट्र शासन,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्र. एचइडी-१६८९/१९६३/सीआर-१८०/एमईडी-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १८ : ऑगस्ट, १९८९

वाचा: १] शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई क्रमांक एचईडी १६८९/१४७०/ के. नं. १३१/८९/एमईडी-७, दिनांक ६. ७. १९८९.
२] तज्ञ समितीचा दिनांक १०. ८. १९८९ चा अहवाल.

<u>शासन निर्णय</u>:- महाराष्ट्र राज्यात वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधा जास्त प्रमाणात उपलब्ध व्हाव्यात अशी सततची मागणी वाढत आहे. त्यामुळे जनतेची मागणी व कांही अंशी गरज भागविण्यासाठी " विना अनुदान तत्वावर" खाजगी होमिओपॅथी [पदविका] महाविद्यालये सुरू करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. सन १९८९-९० च्या शैक्षणिक वर्षापासून नवीन होमिओपॅथी [पदविका] महाविद्यालये सुरु करण्यास परवानगी द्यावी म्हणून ब-याचशा संस्थांचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले होते. त्या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी आणि संस्थांना प्रत्यक्ष भेटी देऊन होमिओपॅथी महाविद्यालये सुरू करण्याची क्षमता त्या संस्थेत आहे. किंवा कसे याचे निरीक्षण करुन वस्तुस्थितीनिष्ठ अहवाल देण्यासाठी शासनाने शासन निर्णय क्रमांक एचईडी-१६८९/१४७०/के. नं. १३१/८९/एमईडी-७, दिनांक ६. ७. ८९ अन्वये एका तज्ञ समितीची नियुक्ती केली होती.

३. सदर तज्ञ समितीने शिफारशींसह त्यांच्या अहवाल, दिनांक १० ऑगस्ट १९८९ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे. तज्ञ समितीच्या शिफारसींची पहाणी करुन शासन आता ह्या निर्णयाव्दारे, या निर्णयासोबत जोडण्यात आलेल्या "परिशिष्ठ-अ" मध्ये देण्यात आलेल्या अटींच्या अधीन राहून खालील संस्थाना नवीन होमिओपॅथी पदविका-डिप्लोमा इन होमिओपॅथी मेडिसीन सर्जरी [डी. एच. एम. एस.] ह्या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालये सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष १९८९-९० या एका वर्षासाठी तात्पुरती [प्रोव्हीजिनल] परवानगी देत आहे.

१] आंतरभारती होमिओपॅथीक व बायोकेमिक मेडिकल कॉलेज, नागपूर.
२] नवलभाऊ प्रतिष्ठान, नवलनगर, जि. धुळे
३] बळीराजा शिक्षण प्रसारक मंडळ, जि. नांदेड

Y.M.T. HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE KHARGHAR

Dr. (Mrs.) S. P. Dandge
Principal
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210.

४] होमिओपॅथीक चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर

५] येरला मेडिकल ट्रस्ट ॲन्ड रिसर्च सेंटर, करीरोड, मुंबई.

४. सदर संस्थांनी परिशिष्ठ-अ मध्ये देण्यात आलेल्या अटींची पूर्तता करावी. या अटींची पूर्तता पाहून सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत निर्णय घेण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ अ. दो. साने ]
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव.

प्रति,

प्रशासक [शा. प्र. ], आयुर्वेद संचालनालय, मुंबई
उपसंचालक, होमिओपॅथी, व्दारा शासकीय होमिओपॅथी रुग्णालय, इर्ला नाका, विलपार्ले, मुंबई.
प्रशासक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथीक, पिरॅमल मॅन्शन, ३ रा मजला, २३५ दादाभाई नौरोजी मार्ग, फोर्ट, मुंबई.
कुलसचिव, मुंबई/पुणे/नागपूर/मराठवाडा विद्यापीठ
अध्यक्ष, अंतरभारती होमिओपॅथीक व बायोकेमिक मेडीकल कॉलेज, नागपूर
अध्यक्ष, नवलभाऊ प्रतिष्ठान, नवलनगर, जि. धुळे,
अध्यक्ष, बळीराजा शिक्षण प्रसारक मंडळ, जि. नांदेड,
अध्यक्ष, होमिओपॅथीक चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर,
अध्यक्ष, येरला मेडीकल ट्रस्ट ॲन्ड रिसर्च सेंटर, करीरोड, मुंबई.

सौ. परब१८८८९

Y.M.T. HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE KHARGHAR

Dr. (Mrs.) S. P. Dandge
Principal
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210.

(१९)

येरळा मेडीकल ट्रस्ट रिसर्च सेंटरचे होमिओपॅथी मेडीकल कॉलेज, खारघर, नवी मुंबई, येथे पदव्युत्तर (एम.डी) अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक :एचएमसी-१४००/सीआर-१०३/शिक्षण-२,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई
दिनांक : ४ डिसेंबर, २००२.

वाचा :१) मुंबई विद्यापीठ, मुंबई, यांचे पत्र क्र.पीजी/१/५२८/२००२, दिनांक ६.३.०२
२) केंद्रिय होमिओपॅथिक परीषदेचे पत्र क्रमांक :१६-५/२००२/ सीसीएच/९९०५, दिनांक ४ जुलै, २००२

**शासन निर्णय** :- येरळा मेडीकल ट्रस्ट रिसर्च सेंटरचे होमिओपॅथी मेडीकल कॉलेज, खारघर, नवी मुंबई, या संस्थेस ऑर्गनन ऑफ मेडीसीन, मटेरिया मेडिका व रेपरेटरी या तीन विषयात नियमित व बहिस्थ स्वरुपात पदव्युत्तर (एम.डी.) अभ्यासक्रम सुरु करण्यास सन २००२-०३ पासून संदर्भाधीन क्र.(२) येथील पत्राद्वारे केंद्रिय होमिओपॅथी परीषदेने दिलेली मान्यता विचारात घेऊन त्या विषयांसमोर दर्शविलेल्या प्रवेश क्षमतेसह नियमित व बहिस्थ स्वरुपात पदव्युत्तर अभ्यासक्रम सन २००२-०३ पासून सुरु करण्यास शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता | |
|---|---|---|---|
| | | नियमित | बहिस्थ |
| १) | ऑर्गनन ऑफ मेडीसीन | ६ | ९ |
| २) | मटेरिया मेडीका | ६ | ९ |
| ३) | रेपरेटरी | ६ | ९ |

सदरची मान्यता ही खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

(१) महाविद्यालयाने वर उल्लेखित पदव्युत्तर अभ्यासक्रमांना मुंबई विद्यापीठाची संलग्नता मिळवावी.

(२) सदरच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी शासन / संबंधित विद्यापीठ मान्य करील त्याप्रमाणे प्रवेश नियम लागू राहतील.

(३) राज्य शासन/ विद्यापीठ / होमिओपॅथी परीषदेने होमिओपॅथिक महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे, संस्थेवर बंधनकारक राहील.

(४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिटयुशनस् (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट ६ ऑफ १९९८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

Y.M.T. HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE KHARGHAR

Dr. (Mrs.) S. P. Dandge
Principal
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210.

20

(५) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/ अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही, असे लेखी अभिवचन संस्थेने दिले पाहिजे.

(६) या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क बी.एच.एम.एस. अभ्यासक्रमाच्या मुक्त व मुल्यभारीत जागांकरिता असलेल्या शुल्काप्रमाणे आकारण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दत्तात्रय बोऱ्हाडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, केंद्रिय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्ली (पत्राने)
कुल सचिव, महाराष्ट्र आरोग्यविज्ञान विद्यापीठ, नाशिक (५ प्रती)
संचालक, आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहायक संचालक, आयुर्वेद, मुंबई/पुणे/नागपूर
प्राचार्य, येरळा मेडीकल ट्रस्ट रिसर्च सेंटरचे होमिओपॅथी मेडीकल कॉलेज, खारघर, नवी मुंबई,
सर्व प्राचार्य, होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालये
मा. मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
सर्व कार्यालयीन कक्ष, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (शिक्षण-२)

Dr. (Mrs.) S. P. Dandge
Principal
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210.

Date: 4/12/2002 Inward No.: YMT/09/2002
Clerk: .......... Inward Clerk: ..........
A.O./O.S.: .......... Accountant: ..........
Principal: ..........
YERALA MEDICAL TRUST & RESEARCH CENTRE
Y.M.T. HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE

Y.M.T. HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE KHARGHAR

(21)

येरळा मेडीकल ट्रस्टचे होमिओपॅथीक
मेडीकल कॉलेज, खारघर, नवी मुंबई येथे
२ विषयातील नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम
सन २००८-०९ पासून सुरु करण्यास
मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग
शासन निर्णय क्र.पीजीएच-१००६/सीआर-३२/०६/शिक्षण-२
मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक: २६ जून, २००८.

वाचा:- आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, आयुष विभाग, केंद्रशासन, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नं.आर.१४०१४/९/२००७-ईपी, दि.३०.५.२००८.

शासन निर्णय:- केंद्र शासनाने उपरोक्त पत्रान्वये दिलेली परवानगी विचारात घेऊन येरळा मेडीकल ट्रस्टचे होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज, खारघर, नवी मुंबई येथे खालील विषयात, प्रत्येक विषयासमोर दर्शविलेल्या प्रवेश क्षमतेसह शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून पदव्युत्तर होमिओपॅथी अभ्यसक्रम सुरु करण्यास खालील परिच्छेद २ मध्ये दिलेल्या अटींच्या अधीन राहून शासन याद्वारे मंजुरी देत आहे.

| अ.क्र. | विषय | वार्षिक विद्यार्थी प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | मेडीसीन | ०३ |
| २. | पेडीॲट्रीक्स | ०३ |

२. अटी:-

१) उक्त अभ्यासक्रमांकरीता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संलग्निकरण प्राप्त करुन घेण्यात यावे व तद्नंतरच त्या जागांवरील प्रवेश करण्यात यावेत.

२) राज्य शासन/केंद्र शासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता कार्यपद्धत अवलंबण्यात यावी.

३) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या पत्र क्र.एफ नं.आर.१४०१४/९/२००७-ईपी, दि.३०.५.२००८.मध्ये विहित केलेल्या अथवा त्यांच्याकडून अथवा राज्य शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

Y.M.T. HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE ★ KHARGHAR

Date : 28/6/08 Inward No.: YHMC/PG/63/08
Clerk : ............Inward Clerk: Dr. Mo
A.O./O.S.: ........Accountant: ..................
Principal : ........Chairman/Trustee: ........
YERALA MEDICAL TRUST & RESEARCH CENTRE
Y.M.T. HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE
P. G. INSTITUTE

Dr. (Mrs.) S. P. Dandge
Principal
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210.

३. सदर आदेश, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या शिफारशीवरुन शासनाने दिनांक २४.४.२००७ रोजी दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राला अनुसरुन केंद्र शासनाने दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि.ला.ढोले)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई

प्राचार्य, येरला मेडीकल ट्रस्टचे होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज, खारघर, नवी मुंबई

ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.

मा.मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक

मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक

अध्यक्ष, असोसिएशन ऑफ होमिओपॅथी मेडीकल कॉलेजेस ऑफ महाराष्ट्र, प्लॉट नं. ९०२, वैनगंगा बिल्डींग, वरळी, सागर को-ऑप हाऊसिंग सोसायटी, सर पोचखानवाला रोड वरळी, मुंबई-२५

निवडनस्ती (शिक्षण-२)

Dr. (Mrs.) S. P. Dandge
Principal
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210.

Y.M.T. HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE KHARGHAR